- UNIT – 4
- व्यवसाय चक्रे (SHORT NOTES)
- CLASS –B. COM. 2SEM.
- BY, PROFE. A. D. PILLEWAN.
- DR. L. D. BALKHANDE ARTS &COMMERCE COLLEGE POUNI.

# व्यवसाय चक्रे (BUSINESS CYCLES )

- व्यापार व्यवसायात तेजी मंदीचे एकामागून एक चक्रे येतात त्यांनाच व्यवसाय चक्रे असे म्हणतात.
- व्यवसाय चक्राच्या व्याख्या - “ HATRE च्या मते, चलणं विस्तार व चलन संकोच याची लहान प्रवृत्ती म्हणजे व्यापार चक्र होय. ”
- बेनहॅम च्या मते, “ भरभराटीचा काळ व त्यानंतर मंदीचा काळ येणे म्हणजे व्यापार चक्र होय. ”
- हॉबीरियर च्या मते, “ चांगल्या व वाईट ”वयापाराच्या तेजी मंदीच्या काळाची अदलाबदल म्हणजे व्यापार चक्र होय. ”

थोडक्यात, तेजीनंतर मंदी असे जे चक्रात्मक बदल अर्थव्यवस्थेत नियमित घडून येतात त्यांना व्यवसाय चक्र आई म्हणतात.

# व्यवसयचक्राचे वैशिष्ट्ये.

- चक्रीय स्वरूप.
- लाटेसारखे बदल.
- असमान बदल.
- सर्वव्यापी घटना. स्मूचयात्मक घटना.
- भिन्न स्वरूप.
- भाग बाजारापासून प्रारंभ.
- भांडवली वस्तु उद्द्योगात अधिक तीव्र.
- आंतर राष्ट्रीय स्वरूप.
- मौद्रिक घटकावर प्रभाव.

- **चक्रीय स्वरूप-** व्यापार  चक्रात जी उंचावचने होत असतात ती चक्रीय स्वरूपाची असतात. तेजीनंतर मंदी आणि मंदीनंतर तेजी  असे असे उंचावचनाचे  चक्रीय स्वरूप असते.
- **लाटेसारखे बदल –** ज्या प्रमाणे समुद्रात भरती ओहटीच्या लाटा एकामागून एक येत असतात, त्याप्रमाणे अर्थव्यवस्थेत तेजीनंतर मंदी व मंदीनंतर तेजी येते.
- **असमान बदल –** अर्थव्यवस्तेत घडून येणारे बदल क्षेत्रनिहाय वेगवेगळे असतात. भांडवली उद्योगातील बदल उपभोग क्षेत्रातील बदलापेक्षा तीव्र असतात.
- **सर्वव्यापी घटना –** व्यापार चक्र ही सर्वव्यापी घटना असून ती अर्थव्यवस्थेच्या सर्व भागात विस्तारित असते एका भागात तेजी आणि दुसऱ्या भागात मंदिअशी परिस्थिती असू शकत नाही.

- **स्मूचयात्मक घटना** –व्यापार चक्र ही आंशिक घटना नसून ती सम्पूर्ण अर्थव्यवस्थेशी संबंधित घटना आहे. ती स्मूचयात्मक असते.
- **भिन्न स्वरूप** –दोन व्यापार चक्रात कालावधी, तीव्रता, स्वरूपात भिन्नता असते.
- **भाग बाजारापासून प्रारंभ** –व्यापार चक्राचा प्रारंभ भाग बाजारातील किमतीतील बदलापासून सुरु होते व उत्पादन, मजुरी, व्याजदर इत्यादींच्या दरावर परिणाम करतो.
- **भांडवलीवस्तू उद्योगात तीव्र** – उपभोग्य वस्तुच्या उद्योगापेक्षा भांडलीवस्तूचा उद्योगात व्यापार चक्र अधिक तीव्र असतात.
- **आंतर राष्ट्रीय स्वरूप** –व्यापार चक्र एका राष्ट्रापुरते मर्यादित न राहता सम्पूर्ण राष्ट्रात ते विस्तारतात.
- **मौद्रिक घटकावर परिणाम** – व्यापार चक्राच्या काळात पतनिर्मिती, रोजगारी, उत्पादन, चलन निर्मिती, चलनवेग इत्यादी मौद्रिक घटकात बदल घडून येतात.

# व्यवसाय चक्राचे प्रकार

- दीर्घ लाटा किंवा कोन्द्रातीफ चक्रे - या चक्राचा कालावधी 50 ते 60 वर्षाचा असतो. व्यवहारामध्ये निर्माण होणाऱ्या या चक्राचा अभ्यास कोन्द्रातीफ यांनी केला म्हणून या दीर्घ लाटांना कोन्द्रातीफ चक्रे असे म्हणतात.


प्रो. कोंद्रातिफने 1780 ते 1920 या काळात इंग्लंड व फ्रान्स देशातील सांख्यिकीय माहिती गोळा करून अडीच वर्ष दीर्घ लाटांचा अभ्यास करून गृहीतके मांडले. त्यांनी दीर्घ लाटांचे तीन कालखंड पाडले असून असे निदर्शनास आणले की, आर्थिक व्यवहाराच्या एका दीर्घकालीन वाढीनंतर आर्थिक व्यवहारात घट होण्याचा एक मोठा कालखंड येतो.

शुंपीटरच्या मते पहिले चक्र औद्योगिक क्रांती, दुसरे चक्र वाफ व पोलादामुळे तर तिसरे चक्र मोटारी व यांत्रिक शक्तीच्या शोधामुळे निर्माण झाले.

# प्रमुख चक्रे किंवा जगलरची चक्रे

- या चक्राचा कालावधी 9 ते 10 वर्षाचा असतो .याचा शोध जगलर यांनी लावला. आर्थिक व्यवहारातील उंचावचनामुळे प्रमुख चक्रे घडून येतात. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत संकोच आणि विस्ताराची क्रिया ठराविक कालावधीने घडून येते त्यालाच मुख्य चक्रे असे म्हणतात.
- लघु किंवा किचन चक्रे – या चक्राने गौण चक्रे असेही म्हणतात. यांचा कालावधी 2 ते 4 वर्षाचा असतो. ती 40 महिन्याच्या कालावधीची असतात. प्रमुख चक्रे व लघु चक्रे यातील अंतराचा प्रथम अभ्यास प्रो. जोसेफ किचन यांनी केला म्हणून त्याना किचन चक्रे असेही म्हणतात. प्रमुख चक्राच्या कालखंडात घडून येणाऱ्या अल्पकालीन चक्रनाच लघु चक्रे म्हणतात.

# व्यवसाय चक्राच्या अवस्था /शुंपीटरचे व्यापार चक्राचे प्रतिमान.



- आकृतीमध्ये सस ही रेषा सम्पुर्ण अर्थव्यवस्थेचा समतोल दर्शवितो, रेषेचा वरचा भाग सामन्याचा वर असून खालचा भाग सामन्याचा खालचा आहे.
- आकृतीमध्ये 1 ली अवस्था तेजीची असून रोजगाराची उच्च पातळी गाठल्यानंतर दुसरी अवस्था घसरणीची अवस्था सुरु होते व खालच्या दिशेला सुरवात होऊन मंदीची 3री अवस्था सुरु होते ही अवस्था कुंडाच्या अवस्थेपर्यंत पोहचली की 4थी पुनरुत्थानाची अवस्था सुरु होते. या अर्थव्यवस्थेत अर्थव्यवस्था हळूहळू वरच्या दिशेने जाते आणि पुन्हा तेजीकडे वाटचाल करते अश्याप्रकारे तेजी, घसरण, मंदी, पुनरुत्थान हे चक्र सातत्याने पुर्ण होऊन इतिहासाची पुनरावृत्ती होते.

# तेजीची अवस्था

- **तेजीची अवस्था** –या अवस्थेत रोजगार व उत्पादनात सतत वाढ होते त्यामुळे उपभोग व वेतानंदरातही वाढ होते. तेजीच्या अवस्थेत व्यावसायिकांना व्यापाऱ्याकडून अपेक्षा वाढलेल्या असतात त्यामुळे ते मोठ्या प्रमाणात बँकाकडून कर्ज घेतात

अश्याप्रकारे तेजीच्या अवस्थेत गुंतवणुकीत वाढ झाल्यामुळे रोजगार वाढतो त्यामुळे उत्पन्नात वाढ होते वस्तुची मागणी वाढते व गुणकारी व त्वरक वाढून वृद्धीचा वेग वाढतो कालांतराने वर्षीच्या मार्गात अनेक अडचणी येतात वतेजीत किमती वाढतात.

**तेजीची वैशिष्ट्ये** – उत्पादनाचा उच्च स्तर, रोजगारात वाढ, उत्पनात वाढ, किंमत वाढ, नफ्यात वाढ, गुंतवणुकीला मोठी प्रेरणा, प्रत्येय विस्तार, वास्तविक गुंतवणुकीचा उच्च स्तर ,अर्थव्यवस्था पुर्ण कार्यक्षम, आशावादी वातावरण.

# घसरण

- तेजीच्या काळात मोठ्याप्रमाणात उत्पादनात वाढ होते मात्र त्यामानाने उपभोग व मागणीत वाढ होत नाही परिणामतः अतिउत्पादनाची स्थिती येते व संपूर्ण अर्थव्यवस्थेत शंकेचे वातावरण निर्मण होऊन उत्पादक काही कालावधीसाठी उत्पादन पुढे ढकलतात व उतपादन बंद करतात त्यामुळे बेकारी वाढते, गुंतवणुकीत घट होते अश्याप्रकारे एकेक उद्योग उत्पादन बंद करून उद्योग बंद पडू लागतात. किमती कमी होतात बेरोजगारीमुळे उत्पन्नात घट होते, उपगभोग, UTPADAN, उत्पन्न, खर्च, किमती व नफा इत्यादीमध्ये घट होते.
- घसरणीचे वैशिष्ट्ये - अर्थव्यवस्थेत शंका व भीतीचे वातावरण, उत्पादन काही काळासाठी बंद होतात,

  बँका पतनिर्मिती कमी करतात, व्यवसायाचा विस्तार संकुचित होतो, श्रमिकांची बेकारी वाढते, गुंतवणूक घटते, गुंतवणूक गुणकारी उलट दिशेने फिरू लागते, नफ्याचे प्रमाण कमी होते, भाग बाजारात भीतीचे वातावरण.

घसरणीमुळे अर्थव्यवस्था हळूहळू मनदीकडे वाटचाल करते.

# मंदी

- घसरणीची कालखंड गेल्यानंतर मंदी येते. मंदीचा कालखंडात अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रात मोठ्या प्रमाणात घट होते. मंदीच्या काळात रोजगार उत्पादन, उत्पन्न, मागणी, गुंतवणूक, क्रयशक्ती यासारख्या सर्व घटकात घट होत असते.
- **मंदीचे वैशिष्ट्ये -** उत्पादन आणि व्यापाराचे कमी प्रमाण, बेकारीत वाढ, उत्पन्नात घट, किंमतीत घट, नफ्यात घट, प्रभा मागणीत घट, निराशावादी अर्थव्यवस्था, प्रत्यय संकोच, स्कंध व भागाच्या कमी किमती, तरलतेची वृत्ती, जोखिमी स्वीकारण्यास उद्द्योजक तयार नसतात व्याजदर कोसळतात, यंत्रनिर्मिती व बांधकाम क्षेत्र ठप्प.
- मंदी हे गतिमान अर्थव्यवस्थेचे कायमचे स्वरूप नसून अर्थव्यवस्थेत काही कालावधीनंतर बदल घडून येतो हळूहळू उत्पादन व मागणीत वाढ होते याच्या परिणामस्वरूप उपभोग, उत्पादन, मागणी वाढून अर्थव्यवस्थेचे पुनुरुत्थान होते

# पुनरुत्थान

- जेव्हा अर्थव्यवस्था मंदीकडून तेजीकडे वळण घेते तेव्हा या अवस्थेला पुनरुत्थान असे म्हणतात.
- पुनरुत्थान अवस्थेचे वैशिष्ट्ये - रोजगार, उत्पन्न व उत्पादनाचा स्तर हळूहळू वाढतो.
- भाग बाजारात स्कंध व भागाच्या किमती वाढू लागतात.
- आशावादी वातावरण निर्माण होते.
- गुंतवणुकीला उत्तेजन मिळते.
- बँका प्रत्यय निर्मिती वाढवतात.
- पुनरुत्थानाची लाट गतिमान होते.
- गुंतवणूक गुणक कार्यान्वित होते.
- अशारितीने तेजी, घसरण, मंदी,व पुनरुत्थान व पुन्हा तेजी या मार्गाने एक व्यापारचक्र पुर्ण होतो.

# व्यापारचक्राच्या अवस्थांचे वैशिष्ट्ये

| अनु | पदे | तेजी | घसरण | मंदी | पुनरुत्थान |
|---|---|---|---|---|---|
| १ | रोजगार | महत्तम | कमी होणे | न्यूनतम | मंद गतीने वाढ |
| २ | उत्पादन | वरचा स्तर | कमी होणे | न्यूनतम | मंद गतीने वाढ |
| ३ | किमती | फार जास्त | कमी होणे | न्यूनतम | मंद गतीने वाढ |
| ४ | मजुरी दर | उच्च | कमी होणे | न्यूनतम | वाढीस प्रारंभ |
| ५ | नफा | उच्च | कमी होणे | न्यूनतम | वाढीस प्रारंभ |
| ६ | बँक प्रत्याय | उच्च | कमी होणे | कमी | विस्तार |
| ७ | बँकेचा निधी | न्यूनतम | वाढीस प्रारंभ | उच्च | मंद गतीने घट |
| ८ | व्यावसायिक अपयश | जास्त नाही | एकदम जास्त | भरपूर | अल्पसे |
| ९ | बांधकाम कार्य | फार जास्त | एकदम कोसळणे | जवळजवळ नाही | मंद गतीने वाढ |
| १० | गुंतवणूक | उच्च | कमी होण्यास प्रारंभ | प्रेरणा नाही | मंद गतीने वाढ |
| ११ | भाग बाजार | तेजीमय | मंदीमय | कोसळलेला | आशादायक |
| १२ | वातावरण | आशावादी | भितीदायक, संशयास्पद, निराशावादी | निराशावादी | आशादायक |

CS Scanned with CamScanner